# नेहरूवाद —महाराष्ट्राच्या परिप्रेक्ष्यातून आकलन

डॉ.विजय एस. तुंटे

**प्रास्ताविकः—**

जवाहरलाल नेहरू हे आपल्या देशाचे प्रथम प्रधानमंत्री होते हीच त्यांची एक ओळख होऊ शकत नाही, तर ते एक महान कर्मयोगी, व्यासंगी व्यक्तिमत्व, लेखक, साहित्यकार, इतिहासकार, कलाकार, कायदेपंडित असे बहुविध गुण दिसून येतात. ते एक गांधीयुगातील जेष्ठ—श्रेष्ठ नेते होते. नेहरूंचे जीवन भारतीय स्वांतंत्र्यांच्या इतिहासात महत्वपूर्ण असे होते. राष्ट्रीय जीवनात नेहरूंचा काळ फारच प्रभावी होता. ते तसे परराष्ट्रधोरणोच शिल्पकार होते, तसे अनेक क्षेत्रांचे निर्माते वा शिल्पकार देखील होते. त्यांना आपण **'आधुनिक भारताचे शिल्पकार'**असे म्हणतो. नव—भारताच्या जडण—घडणीत त्यांचे योगदान अविस्मरणीय स्वरूपाचे होते. ज्यांचा प्रत्यय आजही आपणांस होतो. नेहरूकालीन परिस्थिती ही अत्यंत बिकट व नाजूक होती.भारत—पाक विभाजन, नवोदित राष्ट्रांपुढील पेचप्रसंग , सांप्रदायिक दंगे, जागतिक विचारधारा इ. मुद्दे आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करीत होते. या पार्श्वभूमीवर पंडित नेहरूंनी जो विचार दिला त्यास आपण **'नेहरूमार्ग '** असे म्हणतो.त्यांनी भारतात **विकासाची नव—तीर्थ क्षेत्रे** प्रस्थापित केले. खुद्द प्रस्थापित केले. खुद्द म. गांधी नेहरू संबंधी म्हणतात की, त्यांचे राजकीय धोरणे माझ्या सान्निध्यात तयार झाले तरी आंतरराष्ट्रीय राजकारणा संदर्भात मी त्यांचा शिष्य आहे.

पंडित नेहरूंनी भारतीय राजकारणास नव—प्रेरणा, गती व बळ दिले. भारतीय युवकांवर त्यांचा विशेष प्रभाव पडला होता. कारण ते नियमितपणे युवकांना संबोधित करीत असत. राष्ट्राच्या प्रगतीकरिता ते चिंतनशील असत. त्यांची दृष्टी आंतरराष्ट्रीय स्वरूपाची होती. राष्ट्राच्या विभाजनाविरूध्द ते होते. या संदर्भात गांधी व नेहरू यांच्यात तात्विक भेद दिसून येतात. नेहरू हे मानवी मूल्यांचे भाष्यकार होते. नेहरून आणि भारतीय कॉग्रेस पक्ष हा देखील अध्ययनाचा एक नवा विषय होऊ शकेल कारण नेहरू कॉग्रेसमधील उजवा गट होते. कॉग्रेसला जनताभिमुख करण्याचा त्यांनी प्रयत्न केले. सन 1945—1991 या काळात भारतीय परराष्ट्र धोरणावर नेहरूंच्या विचारांचा मोठा पगडा पडलेला दिसून येतो. एकंदरीत या प्रस्तुत शोधनिबंधात पं. नेहरू आणि महाराष्ट्र यांचा आंतरसंबंध आजच्या परिप्रेक्ष्यात तपासून त्या संबंधीच्या गृहितकांची संशोधनाच्या चौकटीत तपासणी करून काही मुद्यांची उपयुक्ता शोधणे हा हेतू वा सूत्र आहे. कारण नेहरूंनी महाराष्ट्राच्या उत्थानासंबंधी केलेले भाष्य वा कार्ये आजचे महत्व या प्रस्तुत चर्चेमुळे एका वेगळया वैचारिक चौकटीतून विचारमंथन होईल.

**गृहितकेः—**

प्रस्तुत शोधनिबंधोच गृहितके पुढीलप्रमाणे निश्चित केले आहे.

1) राजकीय  व सामाजिक कार्य करण्याहेतूने नेहरू जेल (तुरूंग) मध्ये गेले. तिथे उपवास केले.

2) कॉंग्रेसला जनताभिमुख करून नवीन पीढीच्या हातात सुर्पूद करावे.(जैन आनंदप्रकाश:1956:121) असा त्याचा अभिप्राय होता.

3) नेहरूंचा महाराष्ट्र दृष्टीकोन स्वरूपाचा होता ते एक असीम नम्रतेचे होते.

4) नेहरूंचे निर्णय व धोरणे हे तत्कालीन परिस्थितीच्या विदर्भात होते.

5) मुंबई व विदर्भ बाबत नेहरूंचा दृष्टिकोन विकासात्मक, धोरणात्मक स्वरूपाचा होता. प्रस्तुत गृहितकांचे विश्लेषण पुढील चर्चेत केले आहे.

**क्रांतीकारी व समाजवादी चौकट–**

गांधी पुणे शहरात उपवास करीत होते. त्या काळात नेहरूच्या तुरूंगातील सुटकेनंतर कृष्णाताईचे विवाह निश्चित केले. पुन्हा तुरूंगात जाण्यापूर्वी तिचा विवाह व्हावा. असे नेहरू–गांधी भेट पुण्यात दोन वर्षानंतर झाली. नेहरू पुन्हा शहरातून येत असताना काही दिवस मुंबईत वास्तव्य केले. त्यांनी प्रसिध्द नृत्यकार श्री उदयशंकर आणि त्यांच्या गटाचे नृत्य पाहिले. मुबईत नुकतेच तुरूंगातून सुटलेल्या आपल्या क्रांतीकारकांना, स्नेहीना ते भेटले. (जैन आनंदप्रकाश :1956:121)

तत्कालीन काळात मुंबईत समाजवादी (Socialism) लोकांची संख्या अधिक होती. ते लोक गांधी व कॉंग्रेसच्या कार्यावर टीका टिप्पणी करीत असत. काही समाजवादी असेही होते की , जे स्वतः काहीही करीत नसत केवळ दुसऱ्यांची अलोचना करीत असत. असाही वर्ग अस्तित्वात होता. यांना योग्य दिशा व प्रेरणा देण्याचे कार्य नेहरूनी केले. नेहरूनी पुण्यात काही उदारमतवादी विद्वांनांना ते भेटले. पुण्यात नेहरू servent of India या भुवनात ही गेले. महाराष्ट्रात नेहरूंना अहमदनगरच्य किल्ल्यात बंदिस्त करून ठेवले होते. त्यांना कोणासही भेटू दिले नाही. सर्व जनता गुप्तपणे एकत्र येऊन आंदोलन करीत होते. परिणामस्वरूप नेहरूंना **नैनीजेल** मध्ये रवानगी करण्यात आले. तात्पर्य, महाराष्ट्रीय जनतेत भावनेचे उद्रेक दिसून येत होते. (कित्ताःपृष्ठ 174)

इंग्लंडमध्ये विद्यार्थी दशेत फेबियन समाजवाद संबंधी विचारमंथन करू लागले. त्या संबंधीचे खालील विधान उद्‌बोधक स्वरूपाचे वाटते.

As a student in England. Nehru had toyed with Fabian socialism but in his Autobigography he described his position in 1917 thus: I was a pure nationalist; my vague socialist ideas of college days having sunk into the background.(Ghose sankar:1980:333)वरील विधानातून नेहरूंचा वैचारिक संदर्भ लक्षात येतो त्याचप्रमाणे advance step by step towards the social goal ही त्यांची स्वतःची विचारधारा होती. नेहरू गीता आणि बुध्द शिकवणुकीकडे आकर्षित झाले. हा त्यांचा वैचारिक प्रक्रियेचा संदर्भ मानता येईल.

1972 मध्ये नेहरू रशियांच्या मास्कोला रशियन राज्यक्रांतीच्या दहाव्या वर्धापन दिनासंबंधी भेट दिली. त्यानंतर soviet Russia (1928) हे पुस्तक लिहिले.1929 मध्ये नेहरू म्हणतात की , मी समाजवादी आहे. सामाजिक क्रांतीची ही प्रगतीशील विचारधारा आहे. हे त्यांनी सर्वत्र सांगितले. महाराष्ट्र त्यास अपवाद नाही. गांधीच्या मते, हा समाजवाद मानवतेच्यादृष्टीने उपयोगात यावा, असे त्यांना वाटत होते. नेहरूच्या मते समाजवाद राज्याचा नियंत्रणाचा हा एक सामान्य करार असून तो राज्यनियंत्रणाचा व उत्पादनाचा हेतू यामुळे साध्य होईल. (Ghose sankar : 1980: 339) Classless society या करिता नेहरू प्रयत्नशील होते. परंतू ते डावे नव्हते. काही मार्क्सवादी मूल्याकडे ते आकर्षित झाले. उदा– scientific and anti theological approach of Marxism असे असले तरी मार्क्सचा आर्थिक अन्वयार्थाचा इतिहास नेहरूंना अमान्य होता.

**पं.नेहरूंचा महाराष्ट्र दौरा :–**

भारताचे नेते, प्रधानमंत्री असल्याने नेहरूंचे दौरे नियमित होत असत. दौऱ्यांचा एक भाग म्हणजे घरातल्या घरात सुध्दा माणसांना भेटणे पंडितजींना कित्येकदा कठीण होऊन जात असत. साहसपूर्वक जगा( Live Dangerously) असे विधान करून ते सातत्याने दौरे काढत असत. त्यांच्या अनेक दौऱ्यात त्यांनी 25 फुटावर गोळीबार सुरू असताना भाषण चालू ठेवले. एकंदरित त्यांचा महाराष्ट्राचा दौरा हा विशेष चर्चेचा व विचारमंथनाचा होता. महाराष्ट्रात 1953 मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. अशावेळी नेहरूंनी महाराष्ट्रात 6 दिवसांचा दौरा काढला. या दिवसांत 12 मैल प्रवास 9 जिल्हयातून केला. विमान, आगगाडी, मोटस असे सर्व साधने वापरली. या दौऱ्यात एकूण 50 भाषणे केली. त्यांचा हा दौरा 28एप्रिल 1953 मध्ये बेळगांव पासून प्रारंभ झाला. तेव्हा भारतात प्रांतरचनेचा वाद उत्पन्न झाला होता. त्यांनी मुख्यत्वे आपल्या भाषणातून बेकरी व विकासाचा प्रश्न चर्चेला घेतला. त्यावर विचारमंथन केले. नेहरूनी मुंगी योजना च्या अंतर्गत महाराष्ट्रातील शेतकऱ्याना साडया व धोतरे वाटली. त्यांना सहकार्य केले. नेहरू घराण्यात त्यानी प्रथमतः महाराष्ट्रातील झोपडयात आपले पाऊल ठेवले. आता सोनिया व राहूल गांधी या कृतिची अंमलबजावणी करताना दिसतात.

नेहरूची खानदेश भेट सुध्दा महत्वपूर्ण होती. जळगांव येथील अनपुरे महाराजांना ते भेटले. 2 मे 1953 रोजी धुळे येथे तलाव बांधकाम पाहण्यासाठी गेले. पारोळा येथील भाषणात त्यांनी राणी लक्ष्मीबाईंचा गौरव केला. नेहरूचा महाराष्ट्र दौऱ्याची सांगता 3 मे 1953 रोजी जळगांव येथे समाप्त झाली. नेहरूंचा महाराष्ट्र दौरा या दृष्टिकोनातून महत्वाचे असले तरी, नेहरूवर जे हल्ले झाले त्यात महाराष्ट्र राज्यांचा संदर्भ देखील घ्यावा लागतो. उदाःपहिले, कल्याण रेल्वे स्टेशनवर गावटी बॉम्ब चा स्फोट झाला.(चौकशीत फटाके उडविले, असा निष्कर्ष निघाला) दुसरे, 12 मार्च 1955 रोजी नागपूर येथे एका रिक्षावाल्याने

नेहरूवर सुरा उगावला. अशा काही घटना नेहरूंच्या संदर्भात महाराष्ट्रात घडल्या, ज्यांची नोंद घेणे अध्ययनाच्या दृष्टिने महत्वपूर्ण वाटते.

**जवाहरलाल नेहरूःकाही संदर्भः**

नेहरू आणि महाराष्ट्र यांचा आंतरसंबंध शोधताना काही मुद्दे अध्ययनाच्या दृष्टिने पुढे येतात. पहिले,

after Patels death in 1950 Nehru controlled the government with such authority that in 1950 C.D. Deshmukh, while resigning as a finance minister,said that, the decisions about future of Bombay as also about the seperation of Andhra from Madras were announced by Nehru without reference to the cabinet.(Ghose Sankar:1980:347)

वरील विधानातून मुंबई संबंधीचा मुद्दा प्रकर्षाने लक्षात येतो. तसेच नेहरूंची भूमिका आधोरेखित करता येते. दुसरे, फिरोजगांधी (1957) यांनी सार्वजनिक निधी (Mundra Concerns) संबंधी संसदेत प्रश्न विचारे असता टी.टी. कृष्णामाचारी यांचे उत्तर समाधान देऊ शकले नाही. तेव्हा एम.सी.छगला (तत्कालीन उच्च–न्यायाधिश, मुंबई उच्च न्यायालय) यांच्या नेतृत्वाखाली(One man inquiry Commission.) एकस्तरीय चौकशी समिती प.नेहरूनी नेमली. तिसरे, संसदेने विज्ञान धोरण ठराव (1958) मंजूर केले. त्यास नेहरूनी मूर्त रूप दिले. विज्ञान आणि अवकाश संशोधन क्षेत्रात भरीव प्रगती करण्याहेतूने Bhabha atomic and space research centre, Mumbai च्या स्थापनेत प्रेरणा व बळ दिले. (Chose Sankar:1980:351)

पं. नेहरू यांनी प्रारंभ केलेल्या विकास प्रकल्पांना, शेतीच्या संशोधन प्रसाराला आज मोठे स्वरूप प्राप्त झाले आहे. डॉ. होमी भाभाच्या नेतृत्वाखाली टाटा इन्स्टिटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्च ही संस्था 19 डिसेंबर 1945 रोजी स्थापन करण्यात आली. (अटो मिक रिॲक्टर) केंद्रास प.नेहरूची प्रेरणा होती. भारताच्या सुरक्षेसाठी अणुचाचणी डॉ.होमी भाभा करीत होते. त्यास मंजूरी देण्यापूर्वीच प. नेहरूचे निधन झाले. तात्पर्य, मुंबई येथील ही अणुभट्टी (1956) आशियातील पहिली अणुभट्टी होती. 24 ऑगस्ट 1936 रोजी मुंबईच्या पत्रकारांनी केलेल्या स्वागतप्रसंगी प. नेहरूंचे विधान उद्धत करण्यासारखे आहे.

आधुनिक जगाच्या सार्वजनिक जीवनात पत्रकारीता व पत्रकार फार महत्वाची भूमिका संपन्न करीत आहेत. वृत्तपत्रांनी त्यांच्या धोरणानुसार काही विशिष्ट प्रकारच्या वृत्तांना प्राधान्य दिल्यास, त्यात मला काही गैर वाटणार नाही, परंतू मी वृत्त वा बातमी दडविण्याचा विरोधी आहे.

वरील विधानाचा अनवयार्थ असा की, प.नेहरू हे पत्रकारांची वास्तव भूमिका विषद करतात. महाराष्ट्रातील हे विधान असले, तरी ते संबंध भारतास लागू करण्यासारखे आहे.

**महाराष्ट्रातील कॉंग्रेस आणि नेहरूः–**

कॉंग्रेसआणि नेहरू यांच्या संबंधीचे काही वैचारिक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

1) 1921 जुलैच्या सुरूवातीला नागपूर–कॉंग्रेस बैठक आटोपून नेहरू इलाहाबादला परत गेले.

2) पुणे परिषदेत उपस्थिती

3) खंडबंदीची चळवळ– पुणे–परिषदेने बंद केली.

4) 1929 च्या उन्हाळयात कॉंग्रेस कमिटीची बैठक मुंबई येथे भरली. यात समाजवादी मूल्य महत्वाचे मानण्यात आले. कॉंग्रेसमध्ये समाजवादाचे विचार 1929 मध्ये रोवले गेले. त्यांनंतर 1955 च्या आवडी च्या बैठकीत समाजवादी समाजरचना या तत्वास स्वीकृत करण्यात आले. नेहरू संबंधी पुढील विधान वेगळा संदर्भ विषद करणारे आहे.

Nehru was present at the Nagpur Session of 1920 but did not participate in the Proceedings. However, as the campaign unfolded in the early months of 1921, he was filled with eleation(Mechael Brecher:1959:74) या विधानातून नेहरूचा एक वेगळा दृष्टिकोन पुढे येतो.

25 ते 28 जुलै 1940 रोजी पुण्यात प्रथम कॉंग्रेस कार्यकारिणीची आणे नंतर अ.भा.कॉ. समितीची बैठक झाली यात नेहरू म्हणाले की, कॉंग्रेस हा मूलतः राजकीय पक्ष असल्याचे भान ठेवावे असे मत व्यक्त केले. जवाहरलाल नेहरू कॉंग्रेसमधून बाहेर पडावे आणि स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन करावा, असे तत्कालीन जे.पी. नारायण, पटेल, राजाजी यांचे मत होते. नेहरूच्या संबंधी सुभाषचंद्र बोस फॉरवर्ड ब्लॉक (10 फेब्रु 1940) पत्रातील अग्रलेखात म्हणतात की,

**वर्ध्यापासून दूर कोठेही जवाहरलाल गेले की ते सिंहगर्जना करीत असतात.**

या विधानाचा अन्वयार्थ असा की, महाराष्ट्रातील वर्धा येथे जेव्हा जवाहर येत असत तेव्हा ते शांत होत असत. म्हणजेच वर्धा हे नेहरूचे शांतीचे , नम्रतेचे स्थळ होते.(य.दि.फडके :1997:19–50)

**गृहितकांची सिध्दता पडताळणीः–**

प्रस्तुत शोधनिबंधात आरंभीस जे गृहितके मांडली आहेत. ते कार्यशील आहेत की अकार्यशील याची पडताळणी करणे अध्ययनाच्या दृष्टिने महत्वपूर्ण आहे.

**एकः** नेहरू हे राष्ट्रप्रेमी, राष्ट्रीय नेते, अपार कष्ट घेणारे विचारवंत होते. टिळक–गांधी–नेहरू असा वैचारिक वारसा त्यांना मिळाला. भारताच्या स्वातंत्र्यासाठी , राजकीय व सामाजिक एकात्मतेसाठी नेहरू नऊ वेळा कारागृहात जाऊन आले. अनेक लढयाला विचारसरणीचे वळण लावण्याचा प्रयत्न

केला. कारागृहात असताना ते लेखन प्रकल्प हाती घेत असत. **मिस जेनी स्मिथच्या** मते, नेहरू तुरूंगात जाणार नाहीत. म्हणजे, नवेग्रंथ आपणास वाचावयास मिळणार नाहीत. तात्पर्य, नेहरू हे सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय हेतू साध्य करण्यासाठी कारागृहात जात व तिथे उपवास करीत असत. म्हणून ते गृहितक सिध्द होते.

**दोन::** पं. नेहरू आणि राष्ट्रीय कॉग्रेस यांचा संबंध हा घनिष्ठ स्वरूपाचा दिसून येतो. हिंदी राष्ट्रीय सभेला अधिकाधिक जनताभिमुख करण्याचे इतिहासातील तीन व्यक्ती म्हणजे टिळक—गांधी —नेहरू होत. नेहरू 1929,1936,1937,1951 या वर्षी कॉग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. तत्पूर्वी ते 1923 मध्ये कॉग्रेसच महासचिव होते. नेहरूनी आपल्या ध्येयापर्यंत कॉग्रेसला पोहचविण्याकरिता कॉग्रेसला अधिकाधिक जनताभिमुख केले आणि काही महत्वपूर्ण ठराव मंजूर करून घेतले. उदाः मूलभूत हक्क आणि आर्थिक धोरण, जनसंघटन व जनसंपर्क , इ. तात्पर्य , नेहरूनी कॉग्रेसला नवीन पिढीकडे सुर्पूद करण्याचे प्रयत्न केले यामुळे त्यांना कॉग्रेसमधील उजवा गट म्हणतात. म्हणून हे गृहितक सिध्द होते.

**तीनः** नेहरू आणि महाराष्ट्रयांचा अन्वयार्थ आजच्या परिप्रेक्ष्यात तपासणे उपयुक्त ठरते. कारण ज्या मुद्यांची नेहरूंच्या सकारात्मक दृष्टिकोनाची मांडणी उपरोक्त चर्चेत केले आहे आणि नव—विचार प्रस्तुत करणारे आहे. नेहरू आणि महाराष्ट्र  कॉग्रेस, नेहरू आणि पत्रकरिता, नेहरू आणि समाजवाद, नेहरू आणि विकास प्रकल्प अशा बहुविध महाराष्ट्राच्या परिप्रेक्ष्यात नेहरू सकारात्मक वाटतात. म्हणून हे गृहितक सिध्द होते.

**चारः** नेहरूंचा काळ हा स्वातंत्र्याचा, संघर्षाचा होता. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर नेहरूनी अलिप्तवाद, पंचशिल, पंचवार्षिक योजना, लोकशाही समाजवाद इत्यादी विचार भारतास दिले. ज्याची नोंद आंतरराष्ट्रीय राजकारणावर झाली. नेहरूवर टीकाही झाल्या. उदाःकेंद्रीय प्रवृत्ती असणारा संघराज्याचा पाया हा भारताच्या विभाजनाास जबाबदार होता. परंतू नवोदीत राष्ट्रांना व भारतास एक मुक्त धोरणात्मक व मुक्तव्यासपीठ देण्याचे कार्य नेहरूंनी केले. म्हणून नेहरूवादाचे मूल्यमापन आदर्शवादी संदर्भचौकटीतून न करता तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात करावे लागते. तेव्हाच कुठे भारतीय राजकारणात न्याय व तटस्थता ही मूल्य पाळली जाईल. तात्पर्य, नेहरूंचा तत्कालीन विचार हा परस्पर विसंगती दर्शविणारा असला तरी, तो शांतता व अहिंसेसे, विकासात्मक प्रारूपास प्राधान्य देणारा आहे म्हणून हे गृहितक सिध्द होते.

**पाचवेः** नेहरूंचा मुंबई व विदर्भ दृष्टिकोन विकासात्मक स्वरूपाचा होता. कारण 30 एप्रिल 1960 रोजी नेहरू शिवाजी पार्क(मुंबई) मैदानावरील सभेत बोलताना असे म्हणाले की,

**विदर्भाला सुखी करा नि मुंबईचे वैभव कायम ठेवा.**

हे विधान नेहरूच्या दुरदृष्टिचे घोतक आहे, आज या विधानाची मोडतोड करून आपआपली भूमिका व्यक्त करण्याचा प्रयत्न महाराष्ट्राच्या राजकारणात होत आहे. या उपरोक्त नेहरूंच्या विधानामागे संसाधनाची उपलब्धता, इतिहासाची जपवणूक यांचे समीकरण दिसते. म्हणून नेहरूचा हा दृष्टिकोन विभाजनास पूरक नाही, तर विकासाच्या दृष्टिने उपयुक्त आहे, यामुळे हे गृहितक सिध्द होते.

## सारांश(Conclusion):

उपरोक्त चर्चेत नेहरूवादः महाराष्ट्राच्या परिप्रेक्ष्यातून आकलन या शीर्षकाच्या अंतर्गत काही मुद्यांची चर्चा केली आहे. यात नेहरूनी ठिकठिकाणी केलेले भाष्य , निर्णय व धोरणे यांचा आढावा घेऊन त्याचे आजच्या परिप्रेक्ष्यात विचारमंथन केले असता असे दृष्टिक्षेपास पडते की, नेहरूवाद हा महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टिने उपयुक्त आहे. म्हणून आपणास महाराष्ट्राच्या विकासाचा नेहरूमार्ग असे देखील म्हणता येईल. नेहरूनी महाराष्ट्रात कोयना प्रकल्प उभे करून विकासात्मक कृतिकार्यक्रम राबविले त्याची समाजाची चौकट महाराष्ट्राच्या संदर्भात पुरकच होती. म्हणून नेहरूवाद वा नेहरूमार्ग या दृष्टिने महत्वाचा टप्पा मानता येईल. म्हणूनच नेहरूंना टॅगोर ऋतुराज तर विनोबा भावे लोकात्मा म्हणून संबोधतात. याच अर्थाने नेहरूवाद आजच्या परिप्रेक्ष्यात अधोरेखित करता येईल.

## संदर्भसूची(References):


1) Selected Works of Jawaharlal Nehru, Volume Six, Orient longman, New Delhi, 1974.
2) Selected Works of Jawaharlal Nehru, Volume Four, orient longman, New Delhi, 1973.
3) Selected Works of Jawaharlal Nehru, Volume Elight, Orient longman, New Delhi,1976
4) Selected Works of Jawaharlal Nehru, Volume Seven , Orient longman, New Delhi,1975
5) Selected Works of Jawaharlal Nehru, Volume Five, Orient longman, New Delhi,1973
6) Michael Brecher, Nehru: A Political Biography, Oxford university press, Newyork, 1959.
7) Momathai, My days with Nehru, Vikas Publication, New Delhi, 1979.
8) Gore Narayan Ganesh, Jawaharlal Nehru (In Marathi) , Aoondha Publication, Mumbai,1936 (first Edition)
9) Jain AnandPrakash, Pandit Jawaharlal Nehru, Kailas Printing Press, Agra, Dec. 1956.
10) शेणोलीकर ह.श्री, जवाहरलाल नेहरू, स्वाध्यायमाला, पुष्प 45 वे , प्रौढ, विभाग, वर्ष–1944.
11) तळवळकर गोपीनाथ, आनंदभुवन, कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, 1949.
12) साधना साप्ताहिक, शनिवार, 14 ऑगस्ट 2010, पुणे, पृष्ट.05.